# Good Work Of Nagpur Rural Police

## बुट्टीबोरी अपहरण प्रकरण

## ‘ रौनक ’ ला व्हायचे होते सिनेअभिनेता

पो.स्टे. बुट्टीबोरी :- बुट्टीबोरी येथील होली क्रास मधील ०८ व्या वर्गात शिकत असलेल्या दोन विदयार्थ्यांचे अपहरण झाल्याची बाब दिनांक १०/१२/२०१६ चे ०७.०० वा. ते ०९.०० वा. दरम्यान शनिवारी समोर आली होती. नागपूर ग्रामिण पोलीसांनी या संपुर्ण प्रकरणाचा तपास करीत या दोन्ही मुलांना शोधुन काढले असून त्याचे अपहरण नाही तर बेपत्ता असलेल्या रौनक यादवला सिनेअभिनेता होण्यासाठी तर वडील रागावीत असल्याने साहील शेख यांनी घरातुन पलायन केल्याचे समोर आले आहे. दोघेही मुले सुखरूप मिळाल्याने पोलीसांसह पालकांनी सुद्धा सुटकेचा श्वास सोडला आहे.

बुट्टीबोरी एम.आय.डी.सी. मध्ये राहणारा रौनक यादव व सातगाव येथे राहणारा साहील शेख हे दोघेही बुट्टीबोरी येथील होलीक्रास शाळेत ०८ व्या वर्गात शिकतात. शनिवारी सकाळी ते नेहमीप्रमाणे शाळेत गेले होते. परंतु शाळा सुटल्यानंतर सुद्धा ते परत आले नाही. यामुळे पालकांनी पोलीसांना सुचना दिली. पोलीसांनी लागलीच तपास करण्यास सुरूवात केली. रौनककडे असलेल्या मोबाईलच्या माध्यमातुन तपास सुरू केला असता त्याचे लोकेशन अकोला आले. नंतर पुढे ते शेगाव भुसावळ मिळत गेले. ज्यावेळी त्याचे हे लोकेशन मिळत होते त्यानुसार ते रेल्वेने जात असल्याचे समोर आले. रौनकचे वडील यांनी आपणास मुले आमच्या ताब्यात असल्याचा फोन आल्याचे सांगितल्याने प्रकरणाचे गांभीर्य आणखीनच वाढले होते. दरम्यान हे दोघेही गितांजली एक्सप्रेस मध्ये असल्याचे समोर आले.

सुरूवातील करजत व नंतर कल्याण येथे गाडीची तपासणी करण्यात आली. परंतु दोघेही मिळुन आले नाही. ही गाडी रात्री ११.२३ वा. दादर येथे पोहोचली असता रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलीसांनी गाडीची तपासणी केली. दरम्यान एस ५ बोगीमध्ये हे दोघेही मुले मिळुन आली. त्यासोबत असलेल्या एका व्यक्तीला सुद्धा त्यांनी ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या व्यक्तीची चौकशी केली असता त्याचा या प्रकरणाचा काहीच संबंध नसल्याचे लक्षात आले. यानंतर पोलीसांनी त्यांची चौकशी केली असता अगोदर त्यांनी आपणास गुंगीचे औषध देवुन पळवून नेल्याचे सांगितले होते. परंतु पोलीसांनी नंतर त्यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी दिलेली माहिती धक्कादायक होती.

रौनकला सिनेअभिनेता बनायचे होते. मुंबई येथे गेल्यावर आपण हिरो होवु अशी त्याची धारणा होती. दुसरा मुलगा साहील शेख याला वडील नेहमीच रागावीत होते. यामुळे त्यानेही रौनकसोबत घर सोडण्याचा निर्णय घेतला. शनिवारी दोघेही शाळेत आले. परंतु वर्गात गेलेच नाही. यानंतर त्यांनी थेट नागपूर रेल्वे स्टेशन गाठले. येथुन त्यांनी गितांजली एक्सप्रेस पकडली आणि

मुंबईचा प्रवास सुरु केला. टिटी आला की डब्यातील बाथरूममध्ये लपायचे आणि नंतर परत बाहेर येवुन मिळले. त्या डब्यातील खाली जागेत बसायचे. दादर रेल्वे पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळताच बुट्‌टीबोरी पोलीसांचे एक पथक दादरला रात्रीच रवाना झाले होते. रविवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास या पथकाने दोन्ही मुलांना ताब्यात घेतले. आणि ते नागपूरसाठी रवाना झाले आहे. दोन मुलांचे अपहरण झाल्याचे समोर आल्यानंतर बुट्‌टीबोरीचे ठाणेदार श्री. हेमंत चांदेवार व सायबर सेलचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. अरविंद सराफ यांनी शनिवारी दुपारपासुन ज्या पद्धतीने तपासाचे चक्र फिरवले. त्यामुळे वेळेत या मुलांचा शोध लागु शकला. सोमवारी दोन्ही मुले बुट्‌टीबोरी येथे आल्यानंतर पोलीसांची कारवाई करून त्यांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



पोलीस स्टेशन बुट्‌टीबोरी येथील महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती. भारती कोंडे व कर्मचारी

`